
239e



REFBK-0021836
REFBK-0021836

# ऑड्जेस्टमेन्ट

विश्वास तांबोळी

# ॲड्जेस्टमेंट

विश्वास तांबोळी

REFBK-0021836
REFBK-0021836

ॲड्जेस्टमेंट
विश्वास त्रिंबक तांबोळी

मुद्रक ।।
उदय चिंतामण जोशी, स्वानंद मुद्रणालय, अलिबाग-कुलाबा

प्रकाशक ।।
पां. ना. कुमठा, बॉम्बे बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४०० ००४

मुखपृष्ठ ।। आंतील चित्रे
सुनील प्रधान, अलिबाग

**मूल्य सहा रुपये**

जून १९७७

© विश्वास तांबोळी, आंबेजोगाई.

काव्य
२३१८

तुला ...

तुम्हाला ...

मला ...

आम्हाला ...

त्याला ...

ह्याला ...

तिला ...

हिला ...

ह्यांना ...

त्यांना

ज्यांना ...

...नां

...नां

सौ. आई व ती. नानांना....

काव्य २३१०
२७८३५

क्षणा क्षणांच्या पोटी येती
नवे नवे क्षण
माजतेच अन् उरातळाशी
हरे भरे तण
आत्म्याच्या सौद्यात करपते
ऊन कोवळे
कसे जपावे तडफडणारे
रंग असे घन.

कशी उरावी मुखी कळयांच्या
आतुर गाणी,
कशी खुलावी गर्द आभाळी
शुक्र चांदणी,
थबथबत्या आश्रुंनी भिजते
इवली ओंजळ,
का उमटावी रिक्त काजळी
दर्द विराणी.

# एक कविता—विरून जाण्याची



एक तारा तुटून जाईल
एक तारी फुटून जाईल
एक विश्व निघून जाईल
एक घटका मागं ऱ्हाईल
माग काय ? पाउलवाट,
पाउलवाट सरत जाईल
सरल सरल सरणात टाक
उरलं त्याची भाकर टाक
भाकर खाऊन ढेकर देऊ
म्हणजे सार जिरून जाईल.

थांब म्हणतो, थांबत न्हाई
जातय तर जावू दे.
जा म्हणतो, जात न्हाई
ऱ्हातय तर ऱ्हावूदे.

जाईन न्हाईन मला काय
भाकर खाऊन पसरिन पाय
भाकर माझी मोलाची
कुब्बेराच्या तोलाची
एक दिवस असा येईल
हेही सार विरून जाईल.

तरी एकदा एवढं करीन
आडवं–उभं गणित करीन
उरलं गणित खिशात ठेवीन
सरलं गणित मिशात ठेवीन
उरलं काय, सरलं काय
ठेवलं फेकलं कोण पहाय
पहात असल पाहूदे
नेत असल नेऊदे
तारा तुटला तुटूदे
संग सुटला सुटूदे.

## मला नुमजले माझे मी पण

ब्रम्हांडातील एक ब्रम्ह मी
अन् मातीची माझी काया
ध्वांताच्या गर्तेला पाहून
वळलो, हसलो, पाहून पार दरीच्या
माझे मजला खरेच न कळे,
या ओठावर राठ मिशांचे
अस्तर कैसे ? कैसे अन् तरतरले
पापणीत पाणी पण ?
मला नुमजले माझे मी पण–

कधी उमलत्या रात्री
गात्री होती झुंबरथंडी
श्रावणात ही कधी पेटलो
वैशाखाचे डोळे घेऊन,
घुसळत होतो मनी, मनाला

कधी फेकले स्वैर अंबरी
पतंग कल्पून, उठलेतचना
त्या गीतांचे खोल असे व्रण
मला नुमजले माझे मी पण–

सुपातल्या दाण्यांची होती
केंव्हा काया, माया नव्हती
कधी कुणाची विटली छाया,
धपापले अन् उर, वाटले, झाले,
शून्यच उरले, शून्यांतुन अन्
न्यांकित नेत्रांच्या त्रिज्या
कुठे छेदल्या, कुठे स्पर्शल्या
कुठे बिलगल्या आपुल्या आपण,
मला नुमजले माझे मी पण.

# कंटाळ्याची एक जांभई

आखुड नभाची अथांग उंची
व्यर्थ दाविती चंद्र तारका
क्षितिजा वरचा प्रणय बावरा
गातो गाथा अतृप्तीची.

कुठे चिमुकला हिरवा जुगनू
चमकत चमकत मार्ग कटवतो
आणि मघाचा बालरवी कधि
तापून तापून बुडूनी जातो.

वृक्ष मोडिता वारा क्षणभर
थांबून नंतर वितळुन जातो
चपलेचा अन् लोळ उसळता
ठरतो टेंभा एक क्षणाचा.

जीवनदात्री सरिता सरूनी
मिळते एका मूढ सागरा
अथांगतेचे दर्शन ठरते
कंटाळ्याची एक जांभई.

शरदा मधली रात रुपेरी
वैशाखातिल प्रचंड वणवा
गप्प बिचारी धरा पाहते
आकाशाचा डोळा करुनी.

धुंद शराबी मृदु अधरांचे
चुंबन स्मरती धूसर डोळे
मृत्यू मधल्या नव्या जगाची
वेडी आशा धरुनी हृदयी.

वेरूळच्या त्या लेण्या मधला
फक्त मला तो पत्थर दिसतो
ओघळलेल्या अन् पायाच्या
आयुष्याचा धागा तुटतो.

काल नांदत्या विश्वामधली
आज चिमुटभर राखच उरते
वाऱ्यावरती नाचत जाता
माझ्या कानी गाणे गाते.

# जगा वेगळा

जगा वेगळा अनंत
आसमंत
अंतरंग
जगा वेगळं.

ही अस्थिरता
बधीरता
चित्र धुंदी
जगा वेगळी.

पाऊल वाटच, पण
नाग मोडी
गंध वेडी
जगा वेगळी.

गतिवेडा काळ
कंटाळवाणी जपमाळ
(एकदाच जपायची)
जगा वेगळी

चांचल्य हीन क्षितीजरेखा
मी,
रूक्ष अडसर
जगा वेगळा, जगा वेगळा.

रिक्त रिक्त
तुझ्या-माझ्यातली भाषणे रिक्त,
निरुपणे रिक्त, पारायणे रिक्त
आभूषणे रिक्त, आवर्तने रिक्त
रिक्त शब्दार्थ, घटिका, पळे, निमिषे
रिक्त बोल,
जिथे यक्ष, गंधर्व, किन्नर, तंबरु तृप्त,
रिक्त कपोल
जिथे पलाश, मंदार, गुलाब, शंकासुर सुप्त,
रिक्त नयन
सप्तसिंधूचे गणगोत्र अप्त,
रिक्त अधर,
शब्दरहित सुर्वण तप्त,
रिक्त भाल,
विशाल, आकाश, धरा,
जिथे दुखदा, सुखदा, आपदा, विपदा गुप्त,
रिक्त हास्य,
जिथे वसंत, हेमंत, शिशिर, शरद लुप्त,
रिक्त काळ
वेल्हाळ, लडिवाळ, स्वप्नाळ,
रिक्त आसमंत
अंग, रंग, गंध, छंद अंतरंग
रिक्त तू...........
.........मी रिक्त
रिक्त मृत्यू,
तुझ्या माझ्यातला.



## अंतरंग

मध्यरात्रीची
असहाय्य कालवाकालव,
कलंडलेल्या जाणिवा, उतू गेलेल्या भावना,
नस्ता कल्पनाविलास, आटलेली विचारशक्ती,
जपली जोपासलेली स्वप्नं,
अन् बाहाय्याचा अंधारी नग्न अवतार.
हातात उष्ण अश्रुंचे पलिते घेऊन
नाचत असतो काळ.

## अंग

बिछान्यावर कलंडलेलं माझं प्रेत
उगीचच मधून जिवंत होतं,
कुठली तरी निःसंदिग्ध जाणीव
झटकण्यासाठी,
किंवा अंगाखाली येऊन

बधीर होत चाललेल्या हाताला
जपण्यासाठी.
(कां ? ते त्यालाही माहित नसतं)
तेवढीच चाळवलेली जाग.
उरलेला सगळा अज्ञात काळ.

**आसमंत**

निःश्वास सोडून
मख्खपणानं उभ्या असलेल्या
स्थितप्रज्ञ भिंती,
चांदण्या वाऱ्याचा खळखळाट,
कवतुक पाहणारी आजी, खिडकी.
काळंकुळीत आकाश (बाहेरचं)
'मला काय कसचं... चाऽलू देत' म्हणत.
मग ... ... ...
मला न दिसलेल्या.... हसऱ्या दिशा...
प्रसन्न अरुण...बालरवी...

# सांजवात

दिशा अंधारल्या साऱ्या  म्लान जाहले आभाळ
वातावरणी विरला  रव पक्षांचा वढाळ ।
वेडी रेषा डोंगराची  काळवंडलीच जरा
लोपल्या सूर्याची लाली  गेली करून मुजरा ।
सुस्तावला संथ वारा  सळसळी लव्हाळयास
संगे घेई निघताना  उग्र घाणेरीचा वास ।
क्षितीजाची दाट मिठी  झाली हळूच अजाण
धुंदारल्या आवारात  उठे काजवा चकून ।
एक लकाकता तारा  साऱ्या फिक्कट नभात
त्याला चुकलं पाखरू  करी भरारून साथ ।
शब्द दोन पादुकांचा  पारापाशीच थांबला
नाद घंटेचा गंभीर  दूर हेलावत गेला ।
पारावरची पताका  उभी थकून राहिली
सांजवात देवळाच्या  गाभाऱ्यात स्थिरावली ।

घेतली नव्हती सागरात उडी ह्या,
घेतली होतीस त्या सागरात
ज्या सागराचा बिंदू न् बिंदू
उत्सुक झाला होता,
महा अंदमानातील शृंखला
खळाळून तोडण्यास.
अन् वाट पाहात होता तुझीच,
कारण त्या बिंदूचा मध्य बिंदू
तूच होतास.
धन्य.

तोडीत नव्हतास धागे नारळाचे,
कुटीत नव्हतास निर्जीव काथ्या,
तोडीत होतास गळफास, प्रत्येक घावासरशी
आमच्या गळ्या भोवतीचे,
अन् निर्मित होतास

सूर्य सम्राटाच्या छातीत
एक एक असहाय्य कळ,
प्रत्येक कळेची वेदना
तूच होतास.
धन्य.
करीत नव्हतास जयजयकार
स्वातंत्र्यलक्ष्मीचा,
निर्मित होतास प्रचंड
समुद्रमंथन,
शब्द वासुकी घेऊन.
कमलदलावर विराजमान झालेली
महालक्ष्मी
विश्वासमोर आणण्यासाठी,
तिचा महान पुत्र तूच होतास.
धन्य.

# क्षणांनी

काही क्षणांनी जगायचं असतं
मरणाच्या वेळेपर्यंत,
उच्छृंखल जगाच्या डोळ्यातली
उत्सुकता, भेसूरता, वैराणता
न्याहाळीत.
आम्ही अमर झालो
असं म्हणून त्याला फसवीत--

काही क्षणांनी मरूनही जगायचं असतं,
उरावर मरणाचं ओझं सांभाळीत
(आपल्याच)
उसासे साठवीत, अश्रु गोळा करीत
भयाण, बेताल रात्रींच्या क्षणांची
निर्विकार हातांनी बेरीज वजाबाकी करीत.

काही क्षणांनी विसरून जायचं असतं
आम्हाला, त्यांना, साऱ्यांनाच.
कुठल्या तरी ज्ञातापलिकडच्या दरीत
कधी असून नसल्यासारखं
कधी नसून असल्यासारखं

काही क्षणांनी जगायचं असतं.
कधी उन्मत्त, कधी केविलवाणं
विश्वाच्या अंतापर्यंत, कल्पान्तापर्यंत
आपलीच मखमाली लव कुरवाळीत
आपल्याच काटचा बोऱ्हाटचा चाखीत
साऱ्या जगात फक्त आपणच
असल्यासारखं.
कुठलीही दखल न घेता.

अँजेरस्टमें

नवरंगाची गाफिल दुनिया
स्वस्थ जाहली शांत जाहली
अन् सळसळला शरदामधल्या
मध्यरात्रिचा शीतल वारा.

गांवापासून दूर कोठल्या
रस्त्यावरती पाय थांबले
आणि पुलावर अंग टेकता
स्तब्ध जाहला मनोभोवरा.

स्तब्धच धरती स्तब्ध निलांबर
लुकलुकणारे तारे स्तब्धच
नि:शब्दातच रमले सारे
नि:शब्दाचा मना निवारा.

## अॅडजेस्टमेंट

॥ अठरा ॥

थकल्या शशिचे क्षीण चांदणे
शांतच तेही, शांतच तोही
चपल जलाची खळखळ सोडून
जयवंतीचा शांत किनारा.

गर्द जांभळा गुलमोहर, ती
खळखळ ऐकून शीतल हसला
शिंदींच्या पानांनी हलुनी
निःशब्दाने दिला दुजोरा.

षड्जा मधला सूर कोठला
शांतीतच ह्या विरून गेला
हळूच मी ही विलीन व्हावे
असेच, जैसा सूर निमाला.

## खुळे

मला हिरव्या स्वप्नांची
नको लावूस चाहूल
माझ्या स्वप्नांची काजळी
आज पुरे आहे मला.

क्षितीजाच्या रेषेकडे
नको वेधू लक्ष माझे
सांज झाली आहे तेथे
सूर्य आता मावळला.


वेडे आसवांचा सिंधू
तुझ्या, तोटका पडेल
विझवाया चिता माझी
माझा मीच पेटलेला.

नको आळवू वसंत
नको छेडू करुणाही
फक्त धुक्याचीच रात
अुध्वस्तची दिशा दाही.

कशी वाहिलीस प्रीत
काय पाहिलेस माझे
नाही मुखाने बोललो
आत साठलेले सारे.

अपेक्षेला नको तुझ्या
माझ्या प्रेमाची झालर
मनी जपून ठेवीन
प्रेम तुझे भरजार.

मी माझं निर्माल्य
मलाच वाहून घेतलंय.
ह्या कपाळावरच्या
उभ्या आठ्यांची साक्षय त्याला
लयीत विलयाला जाणाऱ्या
सिगरेटच्या वलयांची
प्राज्ञा नव्हती प्रश्न करायची,
म्हणून ते बिचारे गप्प राहिले.
पण जेव्हां
निर्विकार बुभुळांनी
चुकून कधी पाणावताना
मला हे विचारलं,
तेव्हां त्यांना मी सांगितलं,
मी माझं निर्माल्य
मलाच वाहून घेतलं.



# विलीनानं चलायला सांगितलं

विलीनानं चलायला सांगितलं,
तेव्हां मी
कोरडे डोळे बरोबर घेऊन निघालो.
कालच्या दिवसांची पानं
रबरानं मिटवल्या सारखी
स्वच्छ होती.
वेडया स्वप्नांचं गाठोडं तेवढं
काखोटीला असावं म्हणून
बांधून घेतलंय.
आजचा माळ तर उजाडचय,
तेव्हां चिंताच नको.
उद्याचं कोणी पाहिलंय ?
म्हणून म्हणालो ' चला.'
विस्मृतीचं धुडकं तेवढं बरोबर
घ्यायला पाहिजे होतं,
कधीकाळी कामी पडायचं,
पण ते विसरण्याचा हक्क ही माझाच.
म्हणून निघालो.
जेव्हां पाय थकतील तेव्हां
दुपार असेल,
अन् सावल्या बुडाशी असतील
घटट् बसलेल्या
वितळून घटट् झालेल्या डांबरासारख्या

।। चोवीस ।।

## अशा दुपारी

अशा दुपारी
जाणवते, स्वर साळुंकीचा
दूरून यावा,
आणि असाव्या कानांवर,
शुभ्र ढगांच्या कुजबुज गोष्टी.
आसमंत अन् निरव असावा
शीतलशा अन् रवि किरणांची
पोक्त स्तब्धता
मनी असावी,
अशा दुपारी.

अशा दुपारी
शिरी असावा छायेला
दाट वृक्ष, अन्
दूर कुठेसा
गंध असावा
गर्द गर्द सा,

आणि असावी पाठीला
नांगरटी माया,
अन् तीवरती ससैल अैसी माझी काया,
अशा दुपारी

अशा दुपारी
गगनोन्मुख मुद्रेवर माझ्या
दुपारतीचे स्थीर कवडसे,
अन् दृष्टीला जाग असावी
शीतल ऐसी
निळ्या निळ्या अन्
फिक्या नभाचे
कण मोजाया.

## आस



विरहात तुझ्या माझा
होतो कासावीस जीव
मुक्त कविते मनात
माझ्या सदैव विसाव.

रुक्ष शिखरे गिरींची
रुक्ष जीवनाचे झरे
रुक्ष तुझ्याविना कोटी
ग्रह ताऱ्यांची अंबरे.

वन नंदन स्वर्गीचे
क्षुद्र तुझ्यावीण मज
फुलो मनाच्या कुंजात
तुझे माझे हितगुज.

नको दर्शन मूर्तीचे
छाया गर्द मंदिराची

परी घंटेच्या नादात
हाक तुझ्या दे शब्दांची.

शून्य आमुचे जीवन
शून्य जीवनसंग्राम
एका तुझ्याविना साऱ्या
माझ्या जगाला विराम.

नासो इतिहास जगाचा
सडो विश्वाचे भविष्य
वर्तमानी मी जगाया
तुझी साथ दे अवश्य.

तूच तूच तूच तूच
माझी तृष्णा ही एकच
आस कशीही कोठची
आस फक्त कविताच.

## चिब चिब चांदण्यांत

चिब चिब चांदण्यात
जीव ओला ओला व्हावा,
ओल्या जीवाच्या ओठांनी
राग आसवांचा गावा.

भिजलेल्या अंतराची
भिंग हळू तडकावी,
तडकत्या भिंगावरी
ओली पापणी लवावी.

ओवी धुंद पापणीची
क्षण तिथेच थांबावी,
माठ पहाट वाऱ्याची
संध्ये परी कलंडावी.

आणि दवांच्या कवेत
पात तणांची भिजावी,
जड ताऱ्यांची पापणी
कोणी हळू मिटवावी.

शब्द यातनेच्या पंखी
सुमनांचा जाग यावा.
मूक अश्रूंच्या दवांनी
उषा रंग शिंपडावा.

## अजुन वाटते


अजुन वाटते मनीं असावी
मांगल्याची अस्फुट जाणीव
अजुन वाटते समई मधली
ज्योत सानुली तेवत रहावी ।

अजुन वाटते शीतल वारा
खेळत रहावा
अजुन वाटते अरुणोदय
अरुणोदय व्हावा ।

अजुन वाटते ताऱ्यांनी अंबर
भरून जावे
मनांत माझ्या ताऱ्याविण
कांहीच नुरावे. ।

अजुन वाटते तरुलतिकांवर
फुले फुलावी,
ओंजळ माझी फुलाफुलांनी
भरून जावी ।

अजुन वाटते तृण पात्यावर
दवबिंदू चमकून उठावा,
मनास माझ्या भल्या पहाटे
जाग असावा ।



एके काळी
कुण्या एका महानपणानं,
कानांत (कान धरून)
हळूच सांगीतलं
" हे सगळं अपरिचित
परिचित असू दे "
अन् हा उपदेश
सिंदबादच्या म्हाताऱ्या सारखा
उतर म्हणालो तरी
मानेवरून उतरला नाही.
अन् चष्म्याची काच
परिचितत्वाची धूळ ओढून वावरू लागली.
मग कोणी ... कोणी ... भेटले.
त्याना नव्यानंच नमस्कार केले
चेहऱ्यावरची, बखोटीच्या म्हाताऱ्याची जाणीव
माझी मलाच स्पष्ट दिसे.

एके काळी,
पाय पोटाशी घेऊन धावत होतो
या दारी...
त्या दारी...
पण परिचित दरवाजेही
भेटत होते, ते आपल्या
ओषट चेहऱ्यावर
अपरिचितपणाची इस्तरी करवून घेऊनच,
तेव्हा पायांच्या तळव्यांना विचारलं
"हे ऽ असं कसं ?"
तेव्हां त्यांनी सांगितलं
"अपरिचितांशी परिचित
होण्याच्या भानगडीत पडू नकोस."

## माझं जिवंतपण

माझं जिवंतपण समजावं
म्हणून मी पुष्कळ
प्रयत्न केले हो !
पण, मला हे कळेच ना की,
कालची मूर्तीच्या गळ्यातली
माळ
नेमकी कुठं पडलीय.
शेवटी कंटाळून मी
पुजाऱ्याला विचारलं,
'अहो, शेवटी मी कुठेय ?'
तर फादरच्या शांततेनं तो म्हणाला,
'कोकरा,
आहेस तिथे बरा आहेस.'

## शब्द शब्द

शब्द शब्द विरघळलेला आहे
स्निग्ध अंधाराच्या लिक्विफाईंगरूममध्ये.
आणि निखळलेल्या आसवांच्या उल्कांच्या
झाल्या आहेत गारगोटच्या.
म्हणून थांबल्या नाहीत, ज्वालांच्या जिव्हा.
चाटत आहेत अजून त्याच त्या
लयकारी बधीर लहरी मुर्दाड कुत्र्यांच्या
रडण्याच्या. घुत्कार कुठला...
धुत्कारालाही जाग नव्हती जिथं.
आणि लक्ष लक्ष क्षणांच्या
उडणाऱ्या ठिणग्या (अविरत)
जाळीतच राहिल्या असतील,
जळून चिघळून गेलेल्या
पेरिकार्डियमला.

आणि म्हणूनच आज या निवांतपणी
सनावळीवार लावलेल्या फायलींचे
लाल पिवळे गठ्ठे
सिलसिलेवार जाळायला हवे होते.
नसता,
जळणाची भागली नसती भूक

आणि आटल्याच नसत्या
(आटणाऱ्या सदोदित) दौतीमधील शाया
आणि हा अतृप्त अंधार,
उघडलाच नसता, विरणाऱ्या त्याच्यात
आसवांची संपन्न दालनं,
अन् सदोदित घडली नसती
खदिरांगारी नेत्रांच्या: रक्तरंगी
चितांची पवित्रता.

क्षणांच्या पावलांनी गस्त घालीत
उभा असतो, तेव्हा झळया चाटतात
अन् विरून जातात.
उरलेल्या रक्षेची वावटळ उडेपर्यंत
सोबत देत थांबेल स्मृतीची छाया
आणि रोवलेल्या गोटया चिऱ्यांच्या
भोवती घुटमळतील काही क्षण.
(घुटमळतीलच असंही नाही.)
पुन्हा चालू लागतील वेताळ होऊन
दगडाला एक प्रमाणं वेताळांच्या गोष्टी.
अखंड ... अविरत, ...
पण तिथेच राहिल, नि:शब्दपणानं
घुमत, धुमसत, धुसमुसत,
रक्तहीन, विरक्त,
रिक्त, स्मशान.

## दान

तीन पावलांचं दान मागून
पहिलं पाऊल टाकलं
तेंव्हा,
तळहातावरचं पाणी
दान असून
खारं होतं.
शुक्राचार्यांचे का असेनात,
आसू खारे वाटायचेच.
दुसऱ्या पावली परब्रह्म आठवतं.
परब्रह्म मोजून मापून
तळहातावरल्या केसांइतकं.
तिसरं पाऊल टाकायला
जागा फक्त एकचय
दान देणाऱ्या बळीजवळ
(फक्त) माझाच माथा शिल्लकय

# पुन्हा क्षण

धावत्या झाडांच्या बुंध्यांचा
अजून वीट आला नाही
म्हणून
विशण्णतेनं हे पाहून घे.
पाहून घे कोरडं माळरान,
पाहून घे, थकलेल्या निर्विकार डोळ्यांनी
जोपर्यंत साथ दिली आहे तोपर्यंत.
पुढचा मार्ग मागच्या सारखाच
सरकणारय,
सरकून थांबणारयत इथेच
धुळीचे कण,
पुढच्या घरघराटीच्या वेळेपर्यंत
थांबणाऱ्या
क्षणासारखे.

## जेंव्हा जिव्हा बंद होते

जेंव्हा जिव्हा बंद होते
तेंव्हा रिग्गा रिग्गा उराशी बाळगून
पोसलेल्या
गालावरच्या सुरकुत्या
सांगण्याआधीच
गणित सोडवून बसलेल्या असतात.
प्रश्न तोच, उत्तर तेच.
(किंवा उत्तरं तीच.)
नात्यांनी नाती जुळवायची,
नसता
नातवांनी नाती तोडायची.

जेंव्हा जिव्हा बंद होते,
तेंव्हा मार्ग सरत असतो
अन् त्याची पोंच पोंचलेली असते
(कुठवर? माहित नाही.)
पण, मागे पावलांचे ठसे
उमटलेलेच असतात
उद्याच्या धुळीत बुजण्यासाठी.

जेंव्हा जिव्हा बंद होते
तेंव्हा
हृदयांतून रक्त फक्त
फुफ्फुसातच उतरतं, अन्
त्या रक्ताचे वटबटीत डाग
उठलेले असतात उशांवर
जाण्यासाठी उडून आधीच
सकाळच्या
श्वास दिवसाचा
श्वास रात्रीचा
जगण्यासाठी शिल्लक राहतो,
जेंव्हा जिव्हा बंद होते.



मीही आता एकटाच असतो.
या हवेलीतल्या वाऱ्याफराऱ्यांचा
शांतपणे, उदबत्तीच्या वासासारखा
वास घेत.
नाहीतर...
आढ्यात सरावर
कोळ्यांनी केलेल्या घरांचे
काव्यमय धागे मोजीत.
नाही तर...
दिंडीदरवाज्याच्या
हत्तीच्या मस्तकाशी स्वस्थपणे
झुंज देणाऱ्या खिळ्यांची तीक्ष्णता अंदाजीत.
नाही तर...
अंगणातल्या पिंपळाच्या पानांची
सळसळ, खळखळ, डळमळ
स्वस्थ डोळ्यांनी निरखीत,
नाही तरी करणार काय ? ...
सारंच सोडून दिलंय मी.
नाहीतरी माझं लग्न झालंच आहे
पैलथडीशी.

हीच हवेली,
एवढी हवेली,
पुरेशी आहे मला,
तिच्या माझ्या प्रतिक्षेतच संपलेल्या
सहवासाच्या स्मृतींना उजाळा द्यायला.
तशी ती येते अधून मधून
अंगणातल्या पिंपळाच्या फुलाप्रमाणं,
वावटळीलाही न उडवता आलेल्या
पानांचा चुरचुराट सांभाळीत,
संथ पावलांत.
विसावते ओटीच्या पायरीवरच,
क्षणभर,
मला तिचा फक्त निःश्वासच
ऐकू येतो आताशा,
माझंही उत्तर तेच असतं.
कारण नाहीतरी मी काऽय करणार?
कधी समरसच झालो नाही.
कोंब फुटले असतील कोवळे
पण मोहर असा आलाच नाही.

तरी पण मला माहिती आहे,
तिच्या नि:श्वासांच्या पुरानं वाहून जाणार नाही,
उंबरठा. बिचारा...
आहे तसाऽच आहे.
त्या उंबरठ्याच्या झिजून झिजून
बोळ झालेल्या कोपरांकडे
यथेच्चपणे पहात
ओटीवरच्या नि:शब्दतेत, आरामखुर्चीवर
पडून असतो आताशा.
एकटाच.
काय करणार, परसातल्या
पोखरणीतल्या पाण्यावरचा बावरा
कधी हटतच नाही.
नाही तरी कायय आता...
सारंच असंय
सारंऽ असंचय
ह्या साऱ्यांना असंच हवंय.
मलाही.
एकटाच असतो झालं मीही.

# निष्कर्षाच्या चौरस्त्यावर




निष्कर्षाच्या चौरस्त्यावर
येऊन पोंचलो, तेंव्हा
चारही दिशात अंधार पसरला होता.
आणि पृथ्वीचा पसारा
मध्यात सामावला होता.
शुक्राचार्यांच्या डोळ्याप्रमाणं
अन् अडवून बसला होता,
दानाची धार उद्याच्या.
काडी टोचायचाच अवकाश की...
पण तेवढा अवसर आता कुठेय ?
मग आधारासाठी म्हणून
कुणाला तरी हाक मारावी,
म्हणून मी हाक मारली
"अरे मी ऽऽऽ"
तेंव्हा त्याचे प्रतिध्वनी
दिशादिशांतून येऊ लागले,
मीऽ मीऽ मीऽऽ ीऽ ीऽ ी
बहुधा सगळीकडे कडेच असावेत.
अन् कुठेतरी सुटलेले
सहवास,भोवती हिरव्याकच्च डोळ्यांनी
फिरतच होते.
गुरगुरतच होते.
अन् मग
'मी' च्या प्रतिध्वनीतलं
नेमकं उत्तरच गवसेना.

'हॅलो ऽ'
'हाय'
'... ...'
'... ...'
'कसं काय ?'
'... ...'
'बऱ्याच दिवसानी भेटतोयस्'
'हं ...'
'हो तशी मलाही आताशा फुरसत कुठे असते म्हणा.
तसा भेटतोस अधूनमधून,
एखादी करकरीत फियाट अंगावरून जावी तेंव्हा ...
किंवा मंत्रालयाचा ध्वज
अर्ध्यावर उतरावा तेंव्हा ..
किंवा ऑबेरायच्या बिल्डिंगनं
आकाशाच्या मांडीवर डोकं ठेवावं तेंव्हा ...
किंवा ... ...
किंवा ... ...
तसं तू भेटतोस ती संध्याकाळच असते.
नाहीतरी बोटांच्या बेचकीत
सिगरेटचं थोटुक धरून

कुठल्याशा सेंट झेवियर्सच्या
कॉर्नरवर गप्पा मारीत उभं राहायचे
दिवस गेलेचयत आपले.
मग ...
मी तुझ्या, किंवा तू माझ्या
रुमवर येतोस, किंवा येतो.
मी अस्ताव्यस्त कॉटवर
माझं अस्ताव्यस्त अंग
अस्ताव्यस्तपणे झोकतो,
तुझ्या पाकीटातली किंवा माझ्या पाकीटातली
सिगरेट शिलगावून
आढ्याकडे पहात पडतो.
तुझी दृष्टी माझ्यावरून फिरते.
संथपणे.
‘ We can’t help. Sorry.’ तू.
‘ हं ऽ ... ’ एक दीर्घ निःश्वास.
मी उठतो, चुरगाळलेलं बुशशर्ट झटकतो,
उरलेलं अर्ध पाकीट खिशात घालतो
अन् चालू लागतो.

# पाप

तुझ्या दृष्टीला जेव्हां हात फुटले.
तेव्हां त्या हातांनी
तू आकाशाला कवटाळलेसच.
तेव्हां ते आणि
तूच होतास.
तसे काही साक्षीदार होते ऽ.
उदा. तुझ्या ओठावरचं दूध,
गालावरची लाली,
गरम रक्ताच्या प्रचंड वेगानं
थडथडणाऱ्या धमन्या, इत्यादि, इत्यादि...
पण आज भविष्यानं मारलेली हाक
आमच्या कानी आली आहे.
आम्हालाही कळलंय की,
कालचं भविष्य आजचं भूत होऊन
तुझ्या मानगुटीला बसलंय.
आज तुझ्याच दगडाळलेल्या डोळ्यांना विचारा
"याला जबाबदार कोण ?"
ते कदाचित सांगतील
कदाचित सांगणारही नाहीत
पण सांगितलंच तर असं
"याला जबाबदार तूच."



आणि त्या नि:शब्द अश्रुसंचयावर
अश्विनी मेघाप्रमाणे
यथेच्च व प्रशस्त संचार करणारे
श्वेतांबर पंथीय स्थितप्रज्ञ महानुभाव,
भाव विरहित चेहरे क्षितिजोन्मुख करून,
अथवा धक्क्याला ढोपर टेकवून,
उभे असतात, परलोकगमनासाठी
निघालेल्या महंताप्रमाणं.
वा, नुकतेच ईश्वराचे प्रेषित म्हणून
नेमणूक झाल्यावर पी. एल. ४८० चा
आशीर्वाद
कवलोत्सुक खपोटीवरील
कातडीस देण्यास उभे असल्याप्रमाणे.

गोदीच्या ऐरणीवर, बृहन्मुंबईच्या
कोंदणात बसविलेल्या,
काळाच्या घणांचे घाव घालीत
क्रेनच्या दांड्याकरवी, पुष्ट होत असतात
पी. एल. ४८० चे स्नायू.
ज्यांच्या तालमीचा मलिदा चोपडा
चोपडला जात असतो,

महालक्ष्मीच्या चंदेरी कांतीच्या
कांतांच्या ढेऱ्या, पोटऱ्या, गोबऱ्या दंडादंडांना.
जेथे बोनसांच्या पारदर्शक बंद
दरवाजातून जाऊच शकत नाही
लाल बावटयाची लाली,
म्हणूनच ते " श्री ".

आणि गिरणगावच्या उघडयावाघडया
शेल्फा-शेल्फांतून रचलेली असतात,
पी. एल. ४८० ची पुष्ट फोलपटं,
गेटवेची पोकळी, दोन फासळयांच्या
कमानीत सांभाळीत.
आणि रोजच वाढणारी धुरांची खुंटरं,
खोरं न फिरवताच विरणारी,
चोपडया चामडीवर, तेलाशिवाय
धागे विणीत असतात,
आंतरराष्ट्रीय विश्वव्यापी हितसंबंधांचे.
संध्याकाळची मच्छी साधावी रविवारच्या
म्हणून, पी. एल. ४८० च्या वेगानं.

काव्य
२३१९
२७२३६



## ऐका

ऐका,
तुमचा जगण्याचा अधिकार
काढून घेतला आहे
तुमच्या जगण्याच्याच मोबदल्यात.
आम्ही चोचलेइस्ट.
(आम्ही नकटे आहोत, म्हणून
इतरांनीही आपापली नाकं कापून घेतली
पाहिजेत.)
मागालच, आकाश,
तर देऊ तुमच्या घरांच्या छपरांना
गोंडस आकाशी रंग लावून.
मग कसं बरं वाटेल.
शेवटी वाटण्यासाठीच ना सारं !
तर अशा वाटांनी
वाटाघाटींचे घाट चढतांना
जपून या,

या वाटांना आपले बाहू देत या.
(त्यांच्या मोबदल्यांत मिळेल तुम्हाला
अधिकार,
सही करण्याचा,
निषेधपत्रावर
वैश्विक निर्मितीच्या.)
तेव्हां
ऐका,
या.
येतांना तुमच्या जिवंतपणाची चिन्हें
तुम्हालाही जाणवायला नकोत.
अन्यथा आमचे डोळे
करतील माया,
काढून घेतील कोथळे
फक्त.

# रक्तबिंब



आज
आणखी एका
दैदिप्यमान सुर्याचे
रक्तबिंब
ढळले आहे.
आज आणखी एक
अस्तित्व अस्त पावले आहे.
आता येथे असे कांही जमतील,
ज्यांनी, त्यांच्याच परावर्तित किरणांनी
भूषविली असेल आपली आयाळ,
आणि ते, ज्यांनी
त्याच्या किरणापासून स्वतःला
छत्रीत लपवले असेल,
आणि ते, ज्यांनी
काठावर उभे राहून, त्याच्या किरणांच्या
पहिल्याच स्पर्शाने म्हटले असेल,
"तुम्ही कांही म्हणा राव, पण ते ग्रेटच हं!"
आणि तेही, जे
थुत्तर वाकडं करून उत्तरले असतील
"असतात कांही कांही ब्ले ऽ सेड."
आणि ते, जे म्हणाले असतील
"हां! समझे बेट्टा! इसको बोलते व्वो!"



आणि शपथेवर सांगतो, तेही,
ज्यांनी, अहमअहमिकेनं
त्या सूर्याच्या कातडीच्या चिंधोटचा
आपल्या गुप्त सुळचांनी
जास्तीत जास्त लांब कोण काढून घेतो
याची कॉम्पीटिशन लावली असेल,
अन् त्याच्या रक्ताचा मोठचात मोठा
डाग, आपल्या वक्षावर
मेडलसारखा मिरवला असेल.
मग ते सर्व,
शोकवस्त्र धारण करतील
मग ते सर्व,
शुभ्र रूमाल डोळचास लावतील
मग ते सर्व,
गळा दाटवतील
मग ते सर्व,
मिनिटभर स्तब्ध उभे राहतील
मग ते सर्व,
आपापल्या घरी जातील,
मग ते सर्व
आपापल्या बायकांनी वाढलेली
भेंडीची भाजी अन् पोळी खातील
मग ते सर्व ...

# नित्याचेच

नित्याचीच झाली आहेत ही रडगाणी...
नित्याचेच चमकतात हे काजवे,
नित्याचेच उगवतात हे सूर्य अन्,
नित्याच्याच जळतात त्यांच्या आत्म्यांच्या चिता.
पिकासो, ह्यांचा ही एक कॅनव्हास करून
तुला त्यांच्या आत्म्यांच्या घोडयांना
त्यांच्याच आत्म्यांना तुडवताना एखादा गोर्निका
नाही का दिसला ?
मग नित्यानेच सडलेल्या रंगांनी
तो कॅनव्हास रंगवताना नित्याचे तुझे हात
का थबकले ?

नित्याचेच वाहणारे हे वारे
नित्याचा दुर्गंधच प्रत्येक श्वासातून
पेजेस पेजेस भरून वाहून आणतात
अन्, यांचे असे
त्यांचे तसे
यांचे शुभमंगल
त्यांना P. hd. किंवा असलीच

कसलीशी छच्चोर शिंक, शिंची हाणून जातात.
मेनुहीन, तुझ्या बोला ह्या वाऱ्यांचा मांजा
तू करून लावायला हवा होतास.
पण सूर्योदयापूर्वीच अस्त
पावणारा तुझा नादब्रह्म
ब्रह्मांडमंडित करणं, हे
नित्याचंच होईल, अशी भिती तुला होती ना ?

मीही नित्याने शेक्सपियरच्या
आत्म्याच्या चिंधड्या नित्याने उडवणारे शेख,
पीर होताना पाहतो. वाटतं, त्यांच्या...
साऱ्या किंकाळ्या एखाद्या कवितेत दफनाव्यात.
अन् त्या दफनभूमीवर एक क्रूस रोवावा.

| " त्यांच्या किंकाळ्या येथे चिरनिद्रा घेत आहेत." |

(करम-फरमा इनकी निगरानीके लिए
रु. ७, ५, ३, २, १
१, २, ३, ५, ७.)
पण त्यांचीच पाचही बोटं
माझ्याच ढोपरावर नित्याचीच उमटतात ना !



# वाचा



एकदा,
निसटत्या आसवाला वाचा फुटली.
(पाखराला पंख फुटावे तशी,
आंब्याला मोहर यावा तशी,
ऑरिकल्स पासून ट्रंकस् ऑर्टिरियोसस्
चिरून वेगळा करावा तशी,
अर्थक्वेकनं एकदम दरी व्हावी तशी.)
तेव्हां तो म्हणाला,
"मी एक मुडदा आहे,
माझं अंग उसळत्या लाव्ह्याप्रमाणं थंडय.
(हवं तर पहा)
प्रथम तुम्हा सर्वांचे आभार मानतो,
कारण मित्राचं मढं मित्रच उचलीत असतात.
कारण ते त्याचे मित्र असतात.
अन् मित्रांच्या वासनेला पृथ्वीच्या उरावर
वासनातृप्तीसाठी प्लॉट हवा असतो.
किंवा मढ्याच्याच लिंगाच्या अवाढव्य भुतास
त्याच्या राखेवर बंगला बांधायचा असतो.
(कदाचित इथेही पायात माझ्या
आज्या–पणज्यांचे अस्थिपंजर सापडतील)
आता तुम्ही असे करा.
कारण मी तसे केले आहे.

तुमचा मुडदा पाडणाऱ्याचे आभार माना,
कारण त्यानेच तुमचे जीवन सुसह्य केले आहे.

तुमच्यावर विसंबतील त्यांचा घात करा
कारण त्यावरच तुमची ढेरी वाढणार आहे.

तुमच्या वंशाचे निर्वंश करा
कारण सर्वत्र फक्त देवच राहणार आहेत
अन् ते नाहीतच.

तुमच्या आत्म्याची प्रतारणा करा
कारण त्याचेच नांव जीवन आहे.

पृथ्वीचा उच्छेद करा,
कारण तुम्ही परमेश्वराचे लाडके पुत्र आहा.

त्या दिवसाची वाट पहा जेव्हां
सैतानाचा पुत्र येईल,
जो पितापुत्रातील एकाला नेतो,
पती-पत्नीतील एकाला नेतो,
दळणारीचे पीठ नेतो.

माझी पूजा करू नका, पण तुमच्यापैकी
एकजण लवकरच माझी पूजा करणार आहे.
तेव्हां शिष्य म्हणाले,
'प्रभो, असे कधीच होणार नाही,
अन् झाले तरीही, असे झाले, असे
आम्ही म्हणारच नाही."
तेव्हां त्याने आपल्या हातांनी शिष्यांचे पाय धुतले,
कारण त्यांना आपल्या कर्मांची उपरती होऊ नये.
नंतर तो म्हणाला,
"असे जो वागेल,
त्याला पृथ्वीचे राज्य मिळेल,
तेथे मद्य पिणे, नाचणे व गाणे चालेल,
त्यांच्या गाण्यातील ऱ्हिदम चुकणार नाही
कारण तो नसेलच."
एवढे बोलून तो
समुद्रात मिसळून गेला,

ॲड्जेस्टमेंऽन्टच् करायची झाली असती तर ऽऽ.
हरकत नव्हती,
आम्ही आमच्या आस्मितेची त्रिज्याच
कातडीभोवती गुंडाळून घ्यायला.
सो ऽ हम् च्या केंद्रानं,
सोडायला हरकतच नव्हती,
गीतेची शपथ,
अन् आम्ही आपल्या बीजांचीच
भाकर करून खायला.
म्हणजे, तशी ऽ हरकत नव्हती.
हो ऽ जन्म घेण्याचं पाप तरी
जन्म देण्याच्या पापानंच का फेडा !

ॲड्जेस्टमें ऽन्टच करायची झाली असती तर ऽ ऽ
आम्ही चौदा टिचक्यांनी
फोडायलाच नको होता,
आमच्या डोईचा घडा.
अन् त्यातल्या शित्तड शित्तड
सडक्या पदार्थाचा मास्क चढवून
नको होती ठोकायला बोंब
" विद्रोह ! विद्रोह "
शेवटी मास्क तर आहेच ना! ऽ
मग बोंबल भडव्या.

ॲड्जेस्टमेंट

।। वैसष्ट ।।

ॲड्जेस्टमेऽन्टच करायची झाली असती तर्रऽऽ
हरकत नव्हती,
आम्ही आपल्या शेंड्या किंवा शेंडे
कापून त्यांची पूजा करायला.
तशी त्यांचीही धूप, दीप, नैवेऽद्यार्ती
वगैरे होते की !
म्हणजे अंतराळातून आज
म्हणताही आलं असतं
" Cold genocide "
इस्त्री केलेल्या थोबड्यांनी.
अन् जागा जागा
टांगलेल्या आमच्या
बापांच्या मुंडक्याना
सोडवून (किंवा सडवून)
त्यांची लोणची विकायला
म्हणजे आपलं ॲड्जेसमेऽन्ट साठी होऽ
होऽ ॲड्जेसमेन्टच करायची तर्रऽऽ

नाही तरी झुपकेदार शेपट्या नसल्या,
तरी चालतंच किनई ऽ.
तेव्हां आम्ही कळपाकळपाने
अशाच ठिकाणी चरावे,
जेथे आकाश नसेल,
किंवा एखादे कन्फ्यूशियसी छप्परही नसेल,
किंवा वेदान्त वगैरे सारखी जमीनही नसेल,
किंवा इतिहासाचं गवतही नसेल,
किंवा संस्कृतिचा चिखलही नसेल,
म्हणजे आम्हाला आपल्याच पावलांचे
ठसे सापडणार नाहीत.
हो ऽ, ॲड्जेसमेऽन्टच करायची झाली तर ऽ ऽ...


# रात्र जागते आंधळी

मीया पाजळल्या दीप्ती
उजळल्या नेत्रीं दिशा,
शांत आसवे झोपली
रात्र जागते आंधळी

नीज धरित्रीची शांत
शांत आकाशीचा ठाव
हृदीं कालव उठली
रात्र जागते आंधळी

झापडल्या नयनांनी
घेते अंतरीचा ठाव
फडफडते वाघळी
रात्र जागते आंधळी

डोळसल्या जाणिवांचे
गारठले शून्यकण
शुक्र चांदणी कलली
रात्र जागते आंधळी



REFBK-0021836
REFBK-0021836

आणि आता ह्या एकांतात

अँड्जेस्टमेंट

।। सदुसष्ट ।।

आणि आता ह्या एकांतात
मला माझेच निःश्वास
ऐकू येतात.
आणि ओघळून थिजते,
जळत्या मेणबत्तीखाली
थिजलेल्या मेणासारखी,
त्यांची सांचवण
बेढब बांध्याच्या वृद्धेसारखी
डोळ्यात खुपत असली तरीही,
तृप्तीची प्रतारणा करीत असली
तरीही. ।
तरी त्याच त्यापणाची ओढ
सुरकुतलेल्या मनाचा माग घेत
पडून राहते
कांहीशी कुढत,
कांहीशी कुथत.